**छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका द्वारे पडेगाव येथील गट क्रमांक ६७ ( आरक्षण क्रमांक अ ४१), कत्तलखाना विस्तार पडेगाव छत्रपती संभाजी नगर येथे सामायिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी १५० मॅट्रिक टन प्रतिदिन क्षमतेच्या लँडफिल यंत्रणा उभारणी संदर्भात मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र डॉक्टर सलीम अली सरोवर समोर, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३ जून २०२५ रोजी आयोजित केलेल्या पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीचे इतिवृत्त..**

---

मे. छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका द्वारे पडेगाव येथील गट क्रमांक ६७ ( आरक्षण क्रमांक अ ४१), कत्तलखाना विस्तार पडेगाव छत्रपती संभाजी नगर येथे सामायिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी १५० मॅट्रिक टन प्रतिदिन क्षमतेच्या लँडफिल यंत्रणा उभारणी संदर्भात मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र डॉक्टर सलीम अली सरोवर समोर, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३ जून २०२५ रोजी सकाळी साडेअकरा वाजता पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणी सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्रं.ई-४० ऑफ २०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. संभाजी अडकुणे<br>अतिरिक्त जिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर | : | अध्यक्ष |
| २. श्री. मनिष होळकर<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. श्री.अच्युत नांदवटे<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,<br>छत्रपती संभाजी नगर | : | समन्वयक |

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, छत्रपती संभाजी नगर महानगर पालिकेद्वारे प्रस्तावित सामायिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी १५० टन प्रतिदिन क्षमतेच्या लँडफिल यंत्रणा उभारणी संदर्भातील पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीसाठी आपण जमलो आहोत. प्रकल्प स्थळापासून संबंधित व्यक्तींना सुनावणी स्थळी येण्यासाठी तीन बसेसची व्यवस्था करण्यात आली होती व त्या बसेसच्या दोन्ही दर्शनी बाजूस मराठी व इंग्रजी भाषेतील पोस्टर्स लावण्यात आले होते जेणेकरून सुनावणीसाठी येणाऱ्या जनसमुदायास बसेस ओळखणे सोयीचे होईल.

सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'ब' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजी नगर महानगर पालिकेद्वारे प्रस्तावित सामायिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी १५० टन प्रतिदिन क्षमतेच्या लँडफिल यंत्रणा उभारणी संदर्भातील पर्यावरण विषयक जाहीर जन सुनावणीसाठीचा अर्ज दि. २०/१२/२०२४ रोजी प्राप्त झाला. परंतु जन सुनावणीसाठी आवश्यक शुल्क छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेकडून दिनांक०८/०४/२०२५ रोजी भरण्यात आले. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. १३/०६/२०२५ वेळ-सकाळी ११:३० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. ०६/०५/२०२५ रोजी दैनिक सकाळ, (मराठी भाषा) व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया (इंग्रजी भाषा) या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजी नगर.

३. आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका, छत्रपती संभाजी नगर

४. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजी नगर.

होळकर

५. सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय प्रभाग क्रमांक १ छ. संभाजी नगर महानगरपालिका

६. सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय प्रभाग क्रमांक २ छ. संभाजी नगर महानगरपालिका

७. सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय प्रभाग क्रमांक ४ छ. संभाजी नगर महानगरपालिका

८. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, ता.जि. छत्रपती संभाजी नगर.

९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, ता.जि. छत्रपती संभाजी नगर.

१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

१२. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

जन सुनावणी बाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेमध्ये प्रकल्पासंबंधीत बाधित अथवा इतर व्यक्तींनी छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या लँडफील प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांशाच्या प्रति अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाबाबत आपले मत, विचार, सूचना , हरकती लेखी स्वरूपात सुनावणीच्या दिवसापर्यंत उप छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात याव्यात अथवा सुनावणीच्या दिवशी देण्यात याव्यात . सुनावणी दरम्यान आपले लेखी मत, विचार, सूचना , हरकती सादर केल्या जाऊ शकतात अथवा त्यांचे सादरीकरण केले जाऊ शकते याबाबत आवाहन करण्यात आले. त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे लोकांकडून ईमेलद्वारे २३७ हरकती सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी ही सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचे मत व्यक्त करण्याचे ठिकाण असून पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती संमत करण्याबाबत निर्णय पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय येथे घेतला जाईल. त्यामुळे त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्प बाबतचे त्यांचे मत आक्षेप हरकती सूचना व्यक्त करण्याबाबतचे

टेळकर

आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत सूचना आक्षेप यांचे व्हिडिओ शूटिंग करून त्याबाबतचे इतिवृत्त पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल असे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तक आपल्या प्रकल्पाचे पर्यावरण विषयक ठळक बाबी पर्यावरण विषयक केलेल्या उपायोजना इत्यादी बाबत सादरीकरण करतील असे सांगितले.

परंतु उपस्थित जनसमुदायातील श्री. कृष्णा बनकर व इतर यांनी सुनावणीस हरकत घेत खालील प्रमाणे मत प्रदर्शन केले

१. **श्री. कृष्णा बनकर, माजी नगरसेवक**

"सद्यस्थितीतील अस्तित्वातील कचरा डेपोचा त्रास सर्वसामान्य राहणाऱ्या ६० ते ७० हजार लोकांना होत असून कचरा डेपोतून येणाऱ्या वासामुळे सर्वसामान्य लोकांचे जगणे मुश्किल झाले आहेत असे त्यांनी सांगितले. त्यांनी त्यादरम्यान मिटमिटा येथील कचरा डेपो अनधिकृत पणे पडेगाव येथे विस्थापित केला असून लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अतिरिक्त बसेस मधून येणाऱ्या लोकांना प्रकल्प स्थळी पोहोचल्यानंतर सुनावणी सुरू करा असे त्यांनी सांगितले. त्याचवेळी अस्तित्वातील कचरा डेपो आम्हाला तेथे नको आहे तो तात्काळ बंद करण्यात यावा अन्यथा आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित कार्यालयांविरुद्ध मोर्चे काढून असे त्यांनी निक्षून सांगितले."

"सदर ठिकाणी अस्तित्वात असलेला कचरा डेपो तात्काळ बंद करा आणि सुनावणीसाठी प्रकल्प स्थळावरून अतिरिक्त बसेस निघालेले असून सर्व लोक पोहोचेपर्यंत थांबण्याची विनंती केली. तसेच प्रकल्पाच्या सुनावणीस छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे कर्मचारी जास्त प्रमाणात उपस्थित असून त्यांच्या उपस्थितीत सुनावणी घेणे योग्य नाही असे त्यांनी सांगितले. सदर बाबत त्यांनी जन सुनावणी अध्यक्ष यांना सुनावणी स्थगित करण्याबाबत विनंती केली."

२. **बहुजन समाज पार्टीचे प्रतिनिधी श्री. विजय बचके**

"आज वर्किंग डे असल्याकारणाने सर्वसामान्य जनसमुदाय उपस्थित राहू शकला नाही तरी याबाबत आम्हाला पुढची तारीख द्यावी त्यावेळी आम्ही जन सुनावणी मध्ये आमचं मत नोंदवू असे त्यांनी सांगितले."

टोळकर

३. **श्री चेतन शिंदे ग्लोरीया सोसायटीचे सभासद**

"जाहीर जन सुनावणी आयोजित करून सर्वसामान्य लोकांचे प्रकल्प बाबतचे मत नोंदविण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि अतिरिक्त जिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर यांनी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. परंतु त्याच वेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पडेगाव येथे भरवस्तीमध्ये कचरा डेपोला परवानगी दिल्याबाबत आम्ही निषेध करतो असे त्यांनी सांगितले."

"आमच्या प्रभागात कचरा डेपो निर्माण करून लोकांच्या आरोग्याशी खेळ केला जातोय व त्यामुळे मी आमच्या सोसायटीच्या वतीने प्रशासनाचा निषेध करतो. आजच्या जन सुनावणीस महापालिका आयुक्त उपस्थित राहिले असते तर त्यांच्या नजरेस आम्ही या सर्व बाबी आणून दिल्या असत्या असे त्यांनी सांगितले. कचरा डेपो परिसरात नित्याने वेळी अवेळी कचरा जाळला जातो हे नेहमीचे झाले आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जन सुनावणी बाबतची जाहिरात टाइम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात दिली असून टाइम्स ऑफ इंडिया वाचणारा किती वर्ग पडेगाव प्रभागात राहतो हे तपासण्याची गरज आहे. त्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळ महानगरपालिकेच्या बाजूने काम करते आहे असे वाटते. घनकचरा प्रकल्पामुळे होणाऱ्या वासाच्या त्रासाबाबत व धुराबाबत आम्ही नियमितपणे महानगरपालिकेचे अधिकाऱ्यांशी संपर्क करून तक्रारी करतो परंतु त्याबाबत महानगरपालिकेकडून ठोस कारवाई केली जात नाही. सर्वात जास्त वासाचा त्रास ग्लोरिया सोसायटीस होत असून या ठिकाणी साधारण २०० कुटुंब वास्तव्यास आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे कचरा डेपो बंद करण्याबाबत नियमितपणे तक्रारी आणि पाठपुरावा केला आहे परंतु त्यावर काही कारवाई केली जात नाही. त्यामुळे आम्ही सर्वांना कळकळीची विनंती करतो की पडेगाव स्थित कचरा डेपो तात्काळ बंद करून आमच्या मुलांच्या आरोग्याशी खेळणे बंद करा असे त्यांनी सांगितले."

४. **डॉक्टर यशवंत कांबळे**

"मी सदर परिसरात राहत असून प्रदूषण नियंत्रण मंडळाने जन सुनावणी आयोजित करून आपल्या भागात राहणाऱ्या लोकांना त्यांचे मत आक्षेप नोंदविण्यासाठी संधी दिली आहे त्यामुळे आपण सर्वांनी कचरा डेपोला असलेला आपला विरोध शांतपणे आणि संविधानिक मार्गाने नोंदवावा असे मी सर्वांना सुचित करतो. मानवाच्या शरीरात पाच ज्ञानेन्द्रिय महत्त्वाचे असून प्रदूषणाचा इफेक्ट प्रामुख्याने सदर इंद्रियांवर होतो.

होळकर

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तज्ञ अधिकारी कार्यरत असून त्यांनी त्यांचा अहवाल व आमचं मत शासनास कळवावे ही माझी विनंती. पडेगाव येथील कचरा डेपो बाबत मागील पंचवीस वर्षापासून आंदोलन सुरू असून रहिवासी लोकांना अद्याप यश मिळालेले नाही याबाबत आपण विचार करण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका आत्ता आपल्याकडे अस्तित्वातील घनकचरा प्रकल्पाची वाढ करण्याचा प्रस्ताव घेऊन आलेली आहे. सदर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प वाढविण्यास आमचा रहिवासी लोकांचा पूर्ण विरोध आहे."

५. **डॉक्टर बाळासाहेब मुन्नार**

"मी सदर परिसरात राहत असून पडेगाव येथील कचरा डेपो बाबत मागील पंचवीस वर्षापासून आंदोलन सुरू असून रहिवासी लोकांना अद्याप यश मिळालेले नाही सध्या म्हाडाची साडेसहाशे घरांची मोठी कॉलनी डेव्हलप झाली असून त्या ठिकाणी फक्त ६० ते ७० कुटुंब वास्तव्यास आलेली आहेत. कचरा डेपो विरोधात प्रशासनाकडे नियमितपणे अर्ज केले असून त्याबाबत शासन मूकगिळीची भूमिका घेत आहे. त्यामुळे आम्ही सर्वांना कळकळीची विनंती करतो की पडेगाव स्थित कचरा डेपो तात्काळ बंद करून आमच्या मुलांच्या आरोग्याशी खेळणे बंद करा असे त्यांनी सांगितले."

६. **<u>श्री. रामराव दाभाडे</u>**

"मी सदर परिसरात राहत असून पडेगाव येथील कचरा डेपो बाबत मागील पंचवीस वर्षापासून आंदोलन सुरू असून रहिवासी लोकांना अद्याप यश मिळालेले नाही. कचरा डेपो भोवती साधारण ७० हजार लोक वस्ती असून लोक वस्ती पासून प्रकल्पाचे अंतर किती असावे याबाबत शासनाने भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे."

त्याच दरम्यान, सदर प्रभागाचे माजी नगरसेवक श्री. कृष्णा बनकर यांनी श्री दाभाडे यांना थांबून माननीय अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना उद्देशून बोलले की शासनाने आयोजित केलेल्या जन सुनावणी या गोंडस प्रक्रियेमध्ये प्रकल्प प्रवर्तकाने आमच्यासाठी काय काय नवीन सुविधा दिल्या आहेत किंवा त्यांच्या प्रकल्पाबाबत त्यांनी माहिती द्यावी असे त्यांनी सांगितले.

परंतु श्री रामराव दाभाडे यांनी मला माझे म्हणणे पूर्ण करू द्या असे सांगून मी आजपर्यंत आयुक्त छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका , प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडे नियमितपणे तक्रारी करत असून माझ्या तक्रारीची दखल कुणी घेतलेली नाही किंवा पडेगाव कचरा डेपो बाबत काही कारवाई केली नाही. मी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव दिवशी कलेक्टर ऑफिस समोर सदर बाबत एक दिवसाचे उपोषण केलेले आहे. परंतु अद्याप कचरा डेपो विरोधात कारवाई

टोळकर

करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर प्रकल्प बंद करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सदर बाबी इतिवृत्तात नमूद करून प्रशासनास पाठवून द्याव्यात असे त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळास उद्देशून सांगितले.

७. **<u>श्री. भास्कर मस्के (इंजिनीयर)</u>**

"मी सदर परिसरात राहत असून आजची मीटिंग अस्तित्वातील कचरा डेपो संदर्भात नसून त्याची पुढील प्रक्रिया म्हणजे कचऱ्याचे ढीग जमिनीमध्ये गाडण्यासाठी परवानगी द्यावी म्हणून आहे. कचऱ्याचे ढीग जमिनीत गाडल्यामुळे जमिनीतील त्याची गुणवत्ता खराब होऊन जलप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होईल असे त्यांनी सांगितले. त्यामुळे परिसरातील सर्व बोरवेल व विहिरीचे पाणी प्रदूषित होईल असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी दिल्यानंतर कचरा डेपो पडेगाव येथे स्थलांतरित करण्यात आलेला आहे. प्रकल्प हा घनकचरा प्रकल्पाचा दुसरा टप्पा असून आमचा पहिल्या टप्प्यालाच जे अस्तित्वातील घनकचरा प्रकल्पास विरोध आहे."

८. **<u>श्री. आसिफ खान</u>**

"मी सदर परिसरात राहत असून पडेगाव कचरा डेपो मध्ये सद्यस्थितीत हायकोर्टाने दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केले जात असून कचऱ्यावर प्रक्रिया न करता तो डम्पिंग केला जात आहे."

९. **<u>श्री. शकीर खान, समाजसेवक</u>**

"सदर प्रकल्पासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिली आहे काय? अस्तित्वातील प्रकल्पाला परवानगी कोणी दिली? महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर प्रकल्पा सभोवताली वातावरणातील हवेची गुणवत्ता मोजली आहे काय? घरगुती घनकचरा जाळल्यानंतर महानगरपालिकेकडून नागरिकांना पाच हजार रुपयांचा दंड केला जातो. परंतु पडेगाव घनकचरा प्रकल्प स्थळी घनाकचरा नियमित जाळला जातो याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने महानगरपालिकेत दंड केला आहे काय? इत्यादी अनेक प्रश्न उपस्थित जन सुनावणी समितीस विचारले."

10. अध्यक्ष जन सुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी सांगितले की लँडफिल प्रकल्पास परवानगी दिली नसून जन सुनावणी समितीच्या इतिवृत्तानुसार पर्यावरण विभाग परवानगी द्यावी किंवा कसे यावर विचार करतील. उर्वरित बाबत त्यांनी उप-प्रादेशिक अधिकारी स्पष्टीकरण देण्याबाबत सांगितले.

11.उपप्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक जन सुनावणी समिती यांनी सांगितले की सदर पर्यावरण विषय जन सुनावणी प्रस्तावित घनकचरा लॅंडफिल प्रकल्पासाठी असून सदर सुनावणी दरम्यान आपण व्यक्त केलेले मत सूचना हरकती इतिवृत्तात नमूद करून पर्यावरण विभाग मंत्रालय यांना पुढील निर्णयासाठी पाठवण्यात येईल. पडेगाव येथील अस्तित्वातील घनकचरा प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी दिलेली असून सदर परिसरात वातावरणातील हवेची गुणवत्ता तपासली जाते. पडेगाव घनकचरा प्रकल्पा सभोवतालच्या वातावरणातील हवेची गुणवत्ता व त्याबाबतचे अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका परिसरात अविरतपणे वातावरणातील हवेची गुणवत्ता मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घनकचरा प्रकल्प सुस्थितीत ठेवून व्यवस्थितपणे चालविण्याबाबत छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेस वेळोवेळी निर्देश देण्यात आले असून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर खटले दाखल केलेले असून माननीय न्यायालयात प्रलंबित आहेत. घनकचरा डेपोमध्ये निर्माण होणाऱ्या मिथेन गॅस मुळे काही वेळा शक्यता असून ती आग कोणीही जाणून-बुजून लावत नाही असे त्यांनी सांगितले.

सदर बाबत उपस्थित जनसमुदायातील बऱ्याच लोकांनी ही आग जाणून-बुजून लावली जाते असे म्हणून गोंधळ करण्यास सुरुवात केली. उपस्थित सर्व जनसमुदायाने पडेगाव येथील कचरा डेपो तात्काळ बंद करण्यात यावा अशी मागणी करून गोंधळ केला. त्यादरम्यान बऱ्याच लोकांनी कचरा डेपो बंद करा कचरा डेपो बंद करा अशा घोषणा देऊन गोंधळ करण्यास सुरुवात केली. श्री बनकर यांनी उपस्थित जनसमुदायास उद्देशून जन सुनावणी समिती कचरा डेपो बंद करू शकत नसून फक्त प्रस्तावित प्रकल्पासाठी आपले म्हणणे ऐकून घेण्यासाठी ते आले आहेत असे त्यांनी सांगितले.

कचरा डेपो हटवण्यासाठी आपण स्वतंत्रपणे प्रदूषण नियंत्रण मंडळाविरुद्ध आंदोलन करू असे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने पडेगाव येथे कचरा डेपो अतिक्रमण करून सुरू केलेला आहे. कचरा डेपो सभोवताली पाण्याची गुणवत्ता पूर्णपणे खराब झाली असून पाणी काळ्या, पिवळ्या रंगाचे विहिरी व भूगर्भात आढळून येते . आम्ही सदर कचरा डेपो बंद करण्यासाठी आलो असून कचरा डेपोच्या विस्तारीकरणासाठी आमच्याकडून परवानगी दिली जाणार नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे जनसमुदायाच्या तीव्र भावना व आमचा विरोध शासनास आपण कळवावा ही विनंती असे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकास त्यांचे सादरीकरण उपस्थित जनसमुदायास दाखवावे असे सांगितले.

तेळकर

12.**श्री. गणेश बोंद्रे, ग्लोरिया सोसायटीतील  रहिवासी**

"मी  पडेगाव येथील घनकचरा प्रकल्पाची सद्यस्थितीतील व्हिडिओ क्लिप आणलेली असून त्या व्हिडिओ क्लिप मध्ये महानगरपालिका घनकचरा प्रक्रियेदरम्यान करत असलेल्या त्याची व्याप्ती उपस्थित सर्वांना दिसून येईल. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सन २०११ साली पडेगाव येथे घनकचरा प्रकल्प परवानगी देण्यात आली असून त्यांना कचरा प्रकल्पातील प्रदूषणाची पातळी मोजणे व महानगरपालिके विरुद्ध कारवाई करण्याचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे आहेत. घनकचरा प्रकल्पाच्या स्थान निश्चिती धोरणाबाबत त्यांनी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा उल्लेख करून प्रकल्प स्थळापासून २०० ते ५०० मीटरचा भाग संरक्षित करणे गरजेचे असून त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा विकास महानगरपालिकेने करणे अपेक्षित नाही. परंतु सद्यस्थितीत घनकचरा प्रकल्पाच्या चारी बाजूला संरक्षित झोन ठेवलेला नसून रहिवाशी संकुल बांधण्याची परवानगी महानगरपालिकेकडून दिली जात आहे.

सदर प्रकल्पाच्या सभोवताली पोलीस कॉलनीसाठी रहिवासी संकुल बांधण्याची जागा, धार्मिक स्थळे, म्हाडा व खाजगी  विकासकांनी रहिवाशी व व्यावसायिक संकुले उभी केली आहेत. तसेच शेजारी २०० मीटर अंतराच्या आत पडेगाव विस्तार कत्तलखान्याला परवानगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून देण्यात आलेली आहे. तसेच उपरोक्त बाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका कार्यालय यांच्याकडे तक्रार करण्यात येत आहे परंतु त्याबाबत काहीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सदर बाबत संबंधित दोषी अधिकाऱ्यांवरुद्ध गुन्हेगारी खटले दाखल करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. घनकचरा प्रकल्प स्थळी येणाऱ्या वासाचा बंदोबस्त करण्यासाठी वेळोवेळी महानगरपालिका व छत्रपती संभाजी नगर येथील प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऑफिसला कळविले आहे. पडेगाव येथील कचरा प्रकल्प स्थळी वातावरणातील हवेची गुणवत्ता अविरतपणे मोजण्यासाठी यंत्रणा उभी करण्याची गरज आहे परंतु त्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून महानगरपालिकेस निर्देश देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ उपरोक्त बाबत कार्यवाही करणारे प्राधिकरण असून त्यांच्याकडून काहीच कार्यवाही केली जात नाही. जर छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका विहित नियमाद्वारे घनकचरा प्रक्रिया प्रकल्प चालवत नसेल तर महानगरपालिकेला देण्यात आलेली परवानगी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रद्द केली जाऊ शकते व त्याबाबतचा शासन निर्णय त्यांनी उपस्थितांना वाचून दाखवला.

त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेविरुद्ध कार्यवाही करणे गरजेचे आहे असे त्यांनी नमूद केले. सन २०१८ पासून आज पर्यंत छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या पडेगाव येथील घनकचरा प्रकल्प विरुद्ध नियमितपणे तक्रारी करून सुद्धा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येत नाही व महानगरपालिकेत व त्यांच्या ठेकेदारास पाठीशी घालत आहे असा त्यांनी आरोप केला. पडेगाव घनकचरा प्रकल्पामुळे सभोवतालच्या परिसरात राहणाऱ्या रहिवाशांना श्वसनाचे आजार व इतर आजार होत आहेत."

13.**<u>श्री सुनील जाधव ग्लोरीया रहिवासी संकुलातील रहिवासी</u>**

"सदर जनसुनावणी रद्द करून पुढील जन सुनावणी कचरा डेपोच्या प्रकल्प स्थळी घेण्यात यावी जेणेकरून जन सुनावणी समितीस कचरा डेपोचे वास्तव निदर्शनास येईल."

14.**<u>माजी नगरसेविका श्रीमती मनीषा पटेल यांचे प्रतिनिधी</u>**

"घनकचरा प्रकल्प विरोधी दिलेल्या लढ्यामध्ये आम्ही सर्व सहभागी होतो परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणत्या आधारे छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेत परवानगी दिली याबाबत खुलासा करावा. नाशिक महानगरपालिकेच्या शपथपत्रात २०१६ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांगितले आहे की कचरा डेपो रहिवासी वस्ती पासून पाचशे मीटर अंतरावर असावा. तसेच नदीचे अंतर कचरा डेपो पासून कमीत कमी पाचशे मीटर असणे गरजेचे आहे. परंतु पडेगाव घनकचरा प्रकल्प स्थळापासून नजीकच्या परिसरातून साधारणतः २७० मीटर अंतरावरून नैसर्गिक नदी वाहत असून सभोवतालच्या विहिरी बोरवेल्स प्रदूषित झाले आहेत."

त्यादरम्यान ग्लोरीया रहिवासी संकुलातील रहिवाशींनी पडेगाव घनकचरा प्रकल्पाची चलचित्र फीत दाखविली. सदर चलचित्र किती मध्ये कचरा डेपोला लागलेली आग, सभोवतालचा रहिवासी परिसर व त्याबाबतचे छायाचित्र दर्शवलेले होते. चलचित्र फीत पाहून उपस्थित नागरिकांनी सदर बाबत योग्य ती कार्यवाही करण्याची गरज असल्याचे सांगितले

होळकर

15.**<u>श्रीमती पूजा कुमार, ग्लोरीया रहिवासी संकुलातील रहिवासी</u>**

"मी ग्लोरीया रहिवासी संकुलाची रहिवासी असून मी मागील सात वर्षापासून राहत आहे. आम्ही पडेगाव परिसरात पूर्वीपासून राहत असून कचरा डेपो नंतर बनवण्यात आला आहे. कचरा डेपोच्या प्रदूषणामुळे आमच्या मुलांचे आणि कुटुंबाचे आयुष्य धोक्यात आले असून आम्ही आमचे म्हणणे मांडण्यासाठी आलो आहोत. त्यामुळे सर्व लोकांच्या विनंतीस मान देऊन आपण तिथला कचरा डेपो स्थलांतरित करावा ही विनंती."

16.**<u>श्री कृष्णा बनकर, माजी नगरसेवक</u>**

"आम्ही सदर कचरा डेपो बंद करण्यासाठी आलो असून कचरा डेपोच्या विस्तारीकरणासाठी आमच्याकडून परवानगी दिली जाणार नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे जनसमुदायाच्या तीव्र भावना व आमचा विरोध शासनास आपण कळवावा ही विनंती असे माजी नगरसेवक श्री कृष्णा बनकर यांनी सांगितले. जन सुनावणी समिती आपली सुनावणी घेऊन आपलं मत जाणून घेण्यासाठी आलेले आहेत त्यामुळे त्यांचं प्रकल्पाबाबतचे सादरीकरण आपण जाणून घेण्यास हरकत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले."

17.**<u>प्रोफेसर डॉक्टर भारत पगारे</u>**

"पडेगाव येथील कचरा डेपो आणि लँडफिल साईट एकत्र आलेला असून आम्ही सर्व दोन्ही प्रकल्पांचा विरोध करतो. पडेगाव येथील कचरा डेपो तात्काळ हलविण्यात यावा अशी मी मागणी करतो."

श्रीकृष्ण बनकर यांनी प्रक्षुब्ध जनसमुदायाच्या भावना मंत्रालयापर्यंत पोहोचवण्याबाबत जन सुनावणी समितीस विनंती केली त्याबाबत आयोजक श्री नांदवटे यांनी सांगितले की माझ्याकडे इ-मेल द्वारे एकूण २३७ निवेदने प्राप्त झाली असून सर्व निवेदने मुख्यत्वे करून प्रकल्पा विरोधात आहेत. आपण व्यक्त केलेल्या भावना आणि आपले मत व्हिडिओ रेकॉर्डिंग करून पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल आणि प्रकल्पाच्या परवानगीचा निर्णय फक्त मंत्रालय स्तरावरूनच केला जाईल.

टोळकर

**18.हनुमान मंदिराचे पुजारी श्री. मुरलीधर महाराज**

"सदर परिसरात घनकचरा प्रकल्पामुळे वास आणि दुर्गंधी यांचे साम्राज्य पसरले असून रहिवासी यांचे जगणे मुश्किल झाले आहे. घनकचरा प्रकल्पामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. सदर परिसरात मंदिर व मस्जिद सर्व देवस्थाने असून या भागातून घनकचरा प्रकल्प स्थलांतरित करणे गरजेचे आहे. जय श्रीराम"

**19.म्हाडा प्रकल्पाचे रहिवासी श्री. सिध्देश्वर मधुकर शेळके**

"मी म्हाडा प्रकल्पात राहत आहे. पडेगाव घनकचरा प्रकल्पांच्या नियमाचे पालन महानगरपालिकेकडून केले जात नाही व या सर्व बाबींना जबाबदार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. घनकचरा प्रकल्पामुळे सदर परिसरातील पाण्याच्या वेळी नदी नाले प्रदूषित झाले असून हवा प्रदूषणामुळे नागरिकांना वेगवेगळे आजार होत आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळ हे छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेवर सुद्धा योग्य ती कार्यवाही करून सदर परिसरात दुर्गंधी कमी करू शकते. परंतु प्रदूषण नियंत्रण मंडळ महानगरपालिकेस पाठीशी घालत असल्याचा आरोप त्यांनी केला. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून योग्य ती कार्यवाही होत नसल्याबद्दल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा त्यांनी निषेध केला."

**20.श्री कृष्णा बनकर, माजी नगरसेवक**

"जन सुनावणी समिती आपली सुनावणी घेऊन आपलं मत जाणून घेण्यासाठी आलेले आहेत त्यामुळे त्यांचं प्रकल्पाबाबतचे सादरीकरण आपण जाणून घेण्यास हरकत नाही असे मत श्री. कृष्ण बनकर यांनी व्यक्त केले. उपस्थित जनसमुदायापैकी बऱ्याच लोकांना आपले मत मांडावयाचे आहे. परंतु प्रकल्प प्रवर्तकाने आपले सादरीकरण करावे असे श्रीकृष्ण बनकर यांनी सांगितले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाने प्रकल्प बाबतचे त्यांचे सादरीकरण सुरू केले."

परंतु त्याच दरम्यान उपस्थित जनसमुदायाने कचरा डेपो बंद करा अशा घोषणा देत गोंधळ सुरू केला. उपस्थित जनसमुदाय क्षोभ आणि आवेशाने कचरा डेपो बंद करण्याच्या घोषणा देत हॉलच्या बाहेर निघून गेला. माननीय अध्यक्ष जन सुनावणी समिती व आयोजक जन सुनावणी समिती उपस्थित जनसमुदायास आपल्या जागेवर बसून सादरीकरण पाहण्याबाबत विनंती करत होते. परंतु उपस्थित जनसमुदायातील बहुतांशी लोक सादरीकरण न पाहता निघून गेले.

लोळकर

अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी उपस्थित असलेल्या जनसमुदायास सांगितले की जन सुनावणी दरम्यान प्रत्येकाने व्यक्त केलेले मत हरकती सूचना यांचा समावेश करून इतिवृत्त बनविले जाईल आणि जन सुनावणी कार्यक्रमाची चलचित्र फित पर्यावरण विभाग मंत्रालय यांना पुढील कार्यवाहीसाठी सादर केली जाईल. छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या लँडफिल प्रकल्पाविरुद्ध ई-मेल द्वारे २३७ निवेदने प्राप्त झाली असून अतिरिक्त सर्व प्राप्त झालेले निवेदने इतिवृत्तासोबत पाठवण्यात येतील असे त्यांनी सांगितले. जन सुनावणी कार्यक्रमास हजर असलेल्या सर्व समुदायाचे आभार व्यक्त करून माननीय अध्यक्ष जन सुनावणी समिती यांनी जन सुनावणी संपली असे जाहीर केले.

**(अच्युत नांदवटे)**
**समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

**(श्री. मनिष होळकर )**
**सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजी नगर**

**(श्री. संभाजी अडकुणे)**
**अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी**
**छत्रपती संभाजी नगर**

***************************************